# महाराष्ट्र शासन

**समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग**

शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१४७९/६६/का-५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जुलै १९७९.

**संदर्भ.**—शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी-१३६१-म, दिनांक २१ नोव्हेंबर १९६१.
शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी-१४७५/२७२/का-५, दिनांक ९ डिसेंबर १९७७.

**शासन निर्णय.**—शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी-१३६१-म, दिनांक २१ नोव्हेंबर १९६१ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या व वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्रातील भटक्या जमातीच्या यादीत, क्रमांक ९ वर "गोल्ला" या भटक्या जमातीचा समावेश करण्यात आलेला आहे. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, 'गोल्लेवार, गोलेर' या जातींचा 'गोल्ला' जातीच्या तत्सम जाती म्हणून विमुक्त जाती व भटक्या जमाती या यादीत समावेश करण्यात यावा.

२. शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी-१४७५/२७२/का-५, दिनांक ९ डिसेंबर १९७७ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या इतर मागासवर्गाच्या यादीतील क्रमांक १९३ वगळण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) म. बा. सुळे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.